IMPACT FACTOR : 5.2331(UIF)

REVIEW OF RESEARCH
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# बासाहेब आंबेडकरांच्या विचारांतील कल्याणकारी अर्थशास्त्र




लक्ष्मणराव मस्के
न विद्यार्थीनी ,
बासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

ना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव भारतीय नव्हे तर जागतिक इतिहासातील अजरामर नाव आहे. विशेषतः पृथ्वीच्या संपूर्ण नात/ आयुष्यात भीमराव आंबेडकर हे नाव **'कल्याणकारी विचारांचा राजा व परिवर्तनाचा कर्ता'** असाच राहील. कारण, विश्वरत्न बासाहेब आंबेडकर समाजक्रांतीकारक तत्ववेत्ते होते. याशिवाय राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्म, इतिहास या विषयाचे व्यासंगी अभ्यासक विश्लेषक तर होतेच, पण प्रथम क्रमांकाचे कायदे पंडित होते. या समृध्द ज्ञान भंडाराच्या आधारावरच त्यांनी भारतातील कोट्यावधी ना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत हजारो वर्षे डांबून ठेवणाऱ्या जातीभेद प्रणित पुरातन वर्णाश्रम समाज व्यवस्थेच्या बुरूजावर आपल्या शक्तीने घणाचे घाव घालून त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या आणि अशा रीतीने या देशातील जनतेला लोकशाही क्रांतीचा मार्ग खुला दिला. म्हणजेच या देशाला सर्वोच्च ग्रंथ (संविधान) दिला. म्हणूनच त्यांचे नाव चिरंतन काळापर्यंत अजरामतर राहील. हे त्रिकालवादी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्रपणे भारताच्या व जगाच्या राजकीय व आर्थिक व्यवस्थेचे/ स्थितीचे अध्ययन व संशोधन करून कोटींची तर्कशुध्द मांडणी केली आहे. शोषीत-पिडीत समाजाच्या सर्वांगीण व चिरंतन कल्याणासाठी कोणती आर्थिक, राजकीय व धार्मिक घातक ठरलेली आहेत, कोणती धोरणे आर्थिक संरचनाने अंगिकारली पाहिजे याबाबतचे अभ्यास बाबासाहेबांनी केले. या अभ्यासातूनच साहेबांनी मानव जातीचे कल्याण साधण्यासाठी प्रयत्न केला. विशेषतः हे प्रयत्न आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक दृष्टिकोनातून वीदेखील झाले. मुख्यतः या प्रयत्नांना त्यांनी कार्यशक्तीसह बुध्दीप्रामाण्यवादी, विवेकवादी आणि कल्याणकारी विचारांची जोड दिली. ळेच भारतातील दलित समाज आर्थिक व सामाजिक विकासाच्या परीकक्षेत सामील झाला. एवढेच नव्हे तर या समाजातील काही भाग साच्या पर्याप्त स्थितीपर्यंत पोहचलेला दिसून येतो.

अर्थात, जनसामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या आंबेडकरांनी आपल्या कल्याणकारी विचारांतून मानवी विकास साधला. त्यामुळेच महामानव, प्रज्ञासुर्य व्यक्तीचे कल्याणकारी विचार अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण, बाबासाहेबांच्या या विचारातूनच ाणकारी अर्थशास्त्राचा शोध घेतला येईल.

**णिक दृष्टी / शिक्षणविषयक विचार :-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचं हत्यार आहे. शिक्षणाने माणसाला कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. हे ओळखून डॉ. बाबासाहेबांनी ृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी शिक्षणाचं महत्त्व पटवून दिलं. **'शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे, ते प्यायल्यावर माणून ुरायला लागतो'** असं ते आपल्या समाज बांधवांना कळकळीनं समजावून सांगत. मुख्यतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या जातीत जन्माला ने होते त्या जातीला आणि तत्सम इतर अनेक जातींना हिंदू धर्मातील जाती व्यवस्थेने शिक्षण घेण्याची संधी नाकारली होती. अलीकडील ळात सुध्दा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आणि खालच्या जातीतील सर्वांनाच शिक्षण घेण्यासाठी किती त्रास आणि छळ न करावा लागला व आजही लागतो हेही आपणास पहावयास मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात आले होते की; अडाणी माणूस मनाने गुलाम होतो. त्याचा अडाणीपणा त्याला लाचार, त्वहीन करतो आणि त्यामुळे त्यांच्या जगण्यात न्यूनगंड निर्माण होतो. म्हणून या तळागाळातील समाजातील गुलामगिरी नष्ट करायची असेल,